पणजी : बुधवार,
दि. १४ जानेवारी २०१५
गोवादूत

# दोडामार्ग महाविद्यालयाचा १६ रोजी सांकृतिक महोत्सव

## 'गोवादूत'चे संपादक सचिन परब यांची प्रमुख उपस्थिती

दोडामार्ग, दि. १३ (प्रतिनिधी)

नवनिर्माण शिक्षण संस्थेच्या दोडामार्ग येथील लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण व सांकृतिक महोत्सव शुक्रवारी १६ जानेवारीला होणार आहे. दै. गोवादूत चे संपादक सचिन परब यांना या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित करण्यात आले आहे.

सकाळी १० वा. महालक्ष्मी हॉलमध्ये हा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ होणार आहे. अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन अभिजित हेगशेट्ये असणार आहेत. दोडामार्गचे सरपंच संतोष नानचे, संस्था सदस्य सूर्यकांत परमेकर, स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य विवेकानंद नाईक, बाबूराव धुरी, सूचन कोरगावकर आदी मान्यवरांची उपस्थिती असणार आहे. त्यानंतर दुपारी ३ वा. विविध गुणदर्शनपर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सांकृतिक महोत्सव सप्तरंग २०१५ होणार आहे. या बक्षीस वितरण समारंभास व सांकृतिक महोत्सवास हितचिंतक, आजी-माजी विद्यार्थी व नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य व्ही. ए. पाटील, स्नेहसंमेलन कार्याध्यक्ष दिलीप बर्वे, सांकृतिक विभाग प्रमुख प्रशांत ढेपे व सांकृतिक प्रतिनिधी राजेश नाईक यांनी केले आहे.